# चंदनबाळा




IRBK-0106291

IRBK-0106291

।. सं. वाचनालय, ठाणें
षय बालवाङ्मय
क्र. ६२९०

दा० ग्रा०
८२८१

# चंदनबाला....

अनुक्रम २२८१
विभाग
क्रमांक
नों०दि०
वाचनालय

लेखक:—

श्री. महेन्द्र कुमार गुलाबचंद मर्चन्ट

बी. ए. (ऑनर्स.) कोविद.

थेयरी ऑफ कर्म, दी जैन नोशन ऑफ द सोल, भगवान नेमनाथ, प्रार्थना, 'हिन्दी का साज' पुस्तकाचें कर्ते, माजी संपादक जैन ज्योति, जैनबंधु इत्यादि

म. ग्रं. सं. ठाणे. वा
ग्रा. क. ८२८१
दि.

किमत पांच आणे.

IRBK-0106291

IRBK-0106291

# चिंव चिंव



जगांतील एकूण एक धर्म चारित्र्य-शील याला महत्व देतात. कारण या योगें सामाजिक व्यवस्था सुदृढ राहूने मानवी जीवनाची नैतिक पातळी वर आणावयाची असेल तर त्या साठीं शीलाची अत्यंत जरुरी आहे. शील कांचे सारखें आहे. एकदां भंगले कीं पुन्हां सांधतां येत नाहीं. यामुळें शीलाची जोपासना प्राणापलीकडे करणें हें प्रत्येकाचें पवित्र धार्मिक तसेंच सामाजिक कर्तव्य आहे.

' चंदनवाला ' ही गोष्ट मूळ जैन वाङमयांत आहे. वैशाख महिन्यांत येणारी अक्षयतृतीया हा महिलांचा सण आहे. जैन धर्मांत या दिवसाला विशेष महत्व आहे. या दिवशी जैन लोक वर्षीतपाचें पारणें करतात. वर्षीतप म्हणजे वर्षभर केलेलें तप. एक दिवसाआड उपवास या प्रमाणें वर्षभर तप करणें. हें तप करणारे श्रावक व श्राविका आपल्या तपाचें पारणें ' पालीताणा तीर्थ क्षेत्रावर जाऊन करतात. ज्यांना वर्षभर तप करण्याचीं शक्ति नसते तें तीन दिवस लागोपाठ उपवास करतात, व अक्षयतृतीयेच्या दिवशी पारणें करतात पारणें करण्यांची पद्धत गमतीदार आहे. बाराच्या सुमारास ज्यानें उपवास केला असेल त्याच्या हातांपायांत सुताच्या वेड्या घालतात व त्यास ' उंबरठ्यावर बसवतात. जवळच एका सुपांत उडीदाचो उसळ ठेवतात. साधुमहाराज गोचरीसाठी ( भिक्षेसाठी ) आले कीं मग त्यांना सुपांतील उडदाची उसळ देतात. साधुमहाराज गेल्यावर उपवास करणारा राहिलेली उसळ खाऊन आपला उपवास सोडतो. हें तप ' चंदनवालाना अठ्ठम ' या नांवानें प्रसिद्ध आहे. कां ? तें गोष्ट वाचल्यावर कळून येईलच

जिचें नांव तपाला दिलें आहे त्या साध्वी चंदनवालाचें चरित्र म्हणजेच वसुमतिची गोष्ट होय. शीलरक्षण करताना झालेले हाल व कष्ट, भोगावयाला लागलेल्या यातना, व झालेली अनेक संकटें या सर्वांचें तिनें हसतमुखानें स्वागत करून आपल्या शीलाचें रक्षण केलें. व आर्य संस्कृतीचा ' शीलं परं भूषणं ' हा आदेश पाळला व जैन धर्मांत अजरामर होऊन राहिली. धन्य ती चंदनबाला !

बाल वाचकहो, ' भगवान नेमनाथाचें , स्वागत ज्या उत्साहानें व प्रेमानें केलेत त्याच उत्साहानें व प्रेमानें ' चंदनवाला , चे ही स्वागत कराल व जैन वाङमयांतील आणखी एकादें रत्न तुम्हांस देण्याच्या कामीं मला प्रोत्साहन द्याल अशी आशा बाळगून व महावीरांच्या चरणी वंदन करून सध्या रजा घेतों.

---- महेंद्रकुमार मर्चंट

# चंदनबाला

अनुक्रम 29८...
विभाग ...
क्रमांक
नों. दि. ३९

प्राचीन भारतांतील कौसंबी हें शहर शतानिक राजाची राजधानी म्हणून इतिहास प्रसिद्ध आहे. शतानिक राजा कर्तृत्ववान व शूर होता. त्यानें आपल्या सामर्थ्याच्या जोरावर आपला राज्यविस्तार पुष्कळच वाढविला होता. शतानिक राजा जसा शूर तसा न्यायप्रियही होता. त्याच्या राज्यांत प्रजा सुखी होती. यामुळें शतानिक हा लोकप्रिय झाला होता. त्याच्या राणीचे नांव मृगावती होतें. सुगोत्र नांवाचा त्याचा मुख्य मंत्री होता. नंदा ही सुगोत्राची पत्नीः होय. मृगावती व नंदा यांचें चांगलें सख्य होतें.

त्याचवेळीं चंपापुरीमध्यें दधिवाहन नामक राजा राज्य करीत होता. धारीणी उर्फ पद्मावती त्याची राणी होती. शतानिक व दधिवाहन यांचें कांहीं कारणांवरून वांकडे आलें. शतानिक राजानें आपला मत्री सुगोत्र याच्या सल्ल्यावरून दधिवाहन राजावर चढाई करण्याचें ठरविलें. लढाईची जंगी तयारी करण्यांत आली. एक दिवस शतानिक राजानें अचानक चंपानगरीला वेढा दिला. एकाएकी राजधानी वेढली गेल्यामुळें दधिवाहन राजा फार विवंचनेंत पडला. किल्ल्यांत अन्नसामुग्री भरपूर नव्हती. बचावाचे धोरण अवलंबून किल्ल्यांत अडकून पडणें धोक्याचें होतें. यामुळें शत्रूशीं उघड उघड सामना देण्याखेरीज दुसरा मार्ग नव्हता.

दधिवाहन राजानें शत्रूशीं उघड सामना देण्याचें ठरविलें. त्यानें आपलें सर्व सैन्य एकत्रीत केलें व मरेपर्यंत लढण्याचा आदेश दिला. घनघोर युद्ध झालें. शतानिक राजाचें सैन्य प्राणपणानें लढलें. कांहीं वेळां शतानिक राजाची सरशी तर कांहीं वेळां दधिवाहन राजाची सरशी होत होती. विजयश्री कोणाला माळ घालील याचा संदेह होता. शत्रू–सैन्य पराकाष्ठेनें लढत होतें तर दधिवाहन राजाचें सैन्य 'मारूं किंवा मरूं' अशा ईर्षेनें लढत होतें. परंतु दैव शतानिक राजास अनुकूल होतें. शतानिक राजाच्या सैन्याच्या जोरदार हल्ल्यामुळें अखेर दधिवाहन राजाच्या सैन्यानें हार खाल्ली. दधिवाहन राजाचा पराजय झाला. शतानिक राजाचा जय झाला. दधिवाहन राजा पळून गेला. शतानिक राजानें चंपानगरी लुटण्याचा हुकूम दिला. चंपानगरी सैन्यानें लुटली. ज्याच्या जें हातीं आलें तें त्यानें घेतलें सेनापतीनें राजवाड्यावर आपला मोर्चा नेला. तो थेट जनानखान्यांत जाऊन पोहोंचला. पळून जाण्याच्या बेतांत असलेली पद्मावती राणी व तिची कन्या वसुमति बावरलेल्या स्थितींत त्यांच्या हातीं पडल्या. सर्व लुटीनिशीं शतानिक राजा कौशंबी नगरीस परतला. सेनापतीही सर्व लूट घेऊन परत फिरला. पद्मावतीस व वसुमतीसही त्यानें बरोबर आणलें होतें.

पद्मावतीच्या यौवनानें व रूपानें सेनापतीची मति फिरली, पद्मावती व वसुमतीची स्थिति फारच शोचनीय झाली. अल्लड वसुमति तर झालेला प्रकार पाहून फारच भांबावून गेली. भीतीनें घाबरून गेल्यामुळें तिला कसलेच भान राहिलें नाहीं. झालें काय व होणार काय कांहींच बिचारीला कळेना. पद्मावतीनें मात्र

परिस्थिती हेरली होती. सेनापतीच्या मनाचा चंचलपणा तिच्या ध्यानीं आला होता. आपलें सौंदर्यच आपल्या जीविताचें विष होणार हें तिनें ओळखलें होतें. वेळ आलीच तर काय करावयाचें याचा ठाम निश्चय तिनें केला. अशा बिकट परिस्थितींतही तिचें सौंदर्य अधिक खुलून दिसत होतें. सेनापतीला तर पद्मावतीचें वेडच लागले. पद्मावतीवर तो तर इतका फिदा झाला कीं, तिचें मन वळविण्याचें त्यानें नाना प्रयत्न केलें, पण व्यर्थ. पद्मावती कांहीं वश होईना. सेनापती चिडला, अधीर झाला व शेवटीं त्याच्या मनाचा तोल सुटला. पद्मावतीवर बलात्कार करण्याचा त्यानें अखेर प्रयत्न केला. शीलवती पद्मावतीवर भयंकर प्रसंग येऊन ठेपला. प्राणापेक्षांही मौल्यवान असलेल्या शीलाचा भंग होतो असें पहाताच पद्मावतीनें एका हातानें आपली जीभ बाहेर ओढून काढली व दुसऱ्या हातानें हनुवटीवर जोरानें गुद्दा मारला. जिभेचा तुकडा पडला. तत्क्षणीं पद्मावती इहलोक सोडून गेली.



मुलांनों, ‘शीलं एव भूषणम्’ असें आपला धर्म सांगतो. त्याचें महत्त्व आतां तुमच्या ध्यानांत आलें असेलच नाहीं?

असला हा भयंकर प्रसंग पाहून बिचाऱ्या वसुमतीची काय दशा झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी. राज्य गेलें, पिताश्रींचा पत्ता नाही व इहलोकीं एकच एक आधार असलेली आईही गेली; हें पाहून वसुमतीनें टाहोच फोडला. तिचा शोक, तिचें आक्रंदन व तिचा बिलाप इतका विलक्षण होता की, तो पाहून पाषाणहृदयीं सेनापतीही द्रवला यांत नवल नाहीं.

सेनापतीस हा प्रसंग बघून फार वाईट वाटलें. माणूस मुळांत दुष्ट नसतो. पण मोह त्याला दुष्ट बनवीत असतो. पद्मावतीचा मोह नाहींसा होतांच सेनापतींतील माणुसकी जागृत झाली. वसुमति तरुण नि सुंदर, तिला देखील आतां माझें भय वाटेल व कदाचित् ही गोष्ट शतानिक राजाच्या कानावर जाईल व मग कांहीं आपली धडगत नाहीं असें विचार त्याला सुचलें. आपल्या-बद्दल विश्वास वाटेल असा धीर वसुमतीला याप्रसगीं देणेंच योग्य असें त्याला वाटलें. सेनापती वसुमतीस म्हणाला; ‘बेटा, शोक करूं नकोस. झालें तें झालें. आजपासून मी तुझा पिता व तूं माझी मुलगी. तुझ्या केसासही धक्का लागणार नाहीं.’ आपल्या शील रक्षणाचें हें आश्वासन ऐकून वसुमतीस बरें वाटलें, पण आईची भयंकर स्थिति पाहून तिला पुन्हां पुन्हां रडें कोसळें. शेवटीं सेना-पतीनें मृत पद्मावतीची योग्य ती व्यवस्था लावली व वसुमतीसह तो राजधानीकडे निघाला.

मजल दर मजल करीत सेनापती कौसंबी नगरीस येऊन पोहोंचला. वसुमतीसह तो आपल्या घरीं जाण्यास निघाला.

सेनापतीची पत्नी आतुरतेनें आपल्या पतिराजाची मार्गप्रतीक्षा करीत होती. पतिराज केव्हां येतील व मी त्यांना केव्हां ओवाळीन असें तिला झालें होतें. ती सारखी ओटीवरच बसून होती. लांबून आपले पतिराज आल्याचें तिला कळतांच ती लगबगीनें आंत गेली व आरतीचें सर्व साहित्य घेऊन बाहेर ओटीवर आली. पण ती ज्या उत्साहानें व आनंदानें आंत गेली त्याच्या निमपट उत्साह व आनंद आतां राहिला नव्हता. थोड्या वेळापूर्वी आनंदित दिसणारी ती ललना आतां क्रुद्ध झाली होती. तिच्या तोंडावरचें हास्य केव्हांच लोपलें होतें. आतां तिच्या कपाळावर सतराशें आंठ्या दिसत होत्या. तिच्या नयनांतील उत्कट भाव केव्हांच नष्ट झाला होता. तिचे डोळे लाल झाले होते. सेनापतीनें नुकतेंच एक युद्ध जिकलें होतें. आतां त्याला गृहयुद्ध जिकावयाचें आहे. पोलादी तलवारीचे घाव झेलणारा सेनापति गृहयुद्धांत कुठवर टिकूं शकतो तेंच आतां पहावयाचें आहे. 'सवत' आलेली पाहून सेनापतीच्या पत्नीची तळव्याची आग मस्तकांत गेली. लावण्य आणि शृंगार याची हुबेहुब प्रतिमा बघून तर तिच्या मनांत कालवाकालव सुरु झाली. सेनापतीला या सर्व गोष्टींची कल्पना निमिषार्धांत आली होती. तो कांहीं बोलणार तत्पूर्वीच तावातावानें सेनापतीच्या पत्नीनें त्याचा समाचार घेण्यास सुरवात केली. " आपण आलांत. मला फार आनंद झाला. पण ही कोण बरोबर आणली आहे? हिला मी क्षणभर देखील राहूं देणार नाहीं. तिच्या रुपाला आणि यौवनाला

भुललात वाटतं. या घरांत मला ती एक क्षणभरदेखील खपणार नाहीं. बऱ्याबोलानं ही घाण घराबाहेर काढा नाहींतर हीपहा मी चालले शतानिक राजाकडे. आपली सर्व पापें चव्हाट्यावर आणीन समजलात." शत्रूच्या बाणापेक्षां स्त्रीचे वाग्बाण जास्त जहरी असतात. पत्नीच्या वाग्बाणानें सेनापती घायाळ झाला. तहाचें पांढरें निशाण त्यानें फडकावले. तो वसुमतीला ताबडतोब विकून टाकण्यास कबूल झाला. बिचारी वसुमति! सर्व प्रकार पाहून भेदरूनच गेली. न पाहिलेल्या व ऐकलेल्या गोष्टी प्रत्यक्ष घडतांना पाहून ती अगदीं गर्भगळीतच झाली

सेनापतीनें वसुमतीस 'बेटा' म्हणून हांक मारली. वसुमति चुपचाप उभी होती. सेनापतीनें स्नान केलें व जेवण आटोपलें. नंतर सर्व झोपी गेले. वसुमतीला कसली झोप येणार. ती आपल्या कर्माला दोष देत जागीच होती. तिच्या मनःचक्षूंपुढें स्मृतिचित्रांचा खेळ चालू होता. जो जो तिला मागील आठवण होई तों तों तिचें हृदय अधिकाधिक भरून येई. दुःखाचा जोर असह्य झाला कीं तो अश्रूंच्या रूपानें नयनांवाटे निघून जात होता. वर्तमान व भविष्य यांविषयी वसुमति बरीच साशंक होती. भविष्य काळांतील अनिश्चित भयाण स्वरूप तिच्या मनाला सारखे व्याकूळ करीत होतें. भविष्यकाळच्या निबिड अंधःकारांत ती चांचपडत होती. शारिरीक व मानसिक श्रम तिला भरपूर झालें होतें. विचार करतां करतां शेवटीं अतिश्रमामुळें तिला झोपेनें घेरलें व तशा त्या परिस्थितीतही तिला झोप लागली.

संसारांतील द्वंद्व बहुश्रुतच आहे आज सावली तर उद्यां ऊन. आज श्रीमंती तर उदईक गरिबी. संसार हा विविध रंगांनीं

विधात्यानें रंगविला आहे. निसर्गांत सर्वत्र ही विविधता आपणास पहावयास मिळते. वसंत ऋतूनंतर ग्रीष्म व ग्रीष्मानंतर वर्षाकाल असा हा सृष्टीचा क्रमच आहे. सुखदुःख, उदयास्त, जन्ममृत्यू वगैरे अनेक द्वंद्वें माणसाच्या जीवनांत हरघडी थैमान घालीत असतात, यामुळें खऱ्या शांतिसुखाचा त्यांना कधीं लाभ होत नाहीं. परंतु ध्रुवासारखी अढळ ईश्वरनिष्ठा, सत्य व शील ज्यांच्या अंगीं आहेत तीं माणसेच हें द्वंद्व जिंकतात व संकटाचे पर्वतच्या पर्वतही जरी त्यांच्यावर कोसळून पडले तरीही अंतीं तेच विजयी होऊन खऱ्या शांतिसुखाचा लाभ घेतात. ही गोष्ट आपण पक्की लक्षांत ठेवली पाहिजे.

सेनापतीनें वसुमतीला बाजारांत नेलें. माणसाची पण किंमत होते अं! पैसा माणुसकी विकत घेऊं शकतो. त्याकाळीं माणुसकी होती कीं नव्हती कोण जाणे. स्वरूप सुंदरी वसुमतीस बघितल्यानंतर बाजारांतील मुख्य केंद्र तीच बनली. मुख्य गिऱ्हाईक एक वेश्या होती. तिनें वसुमतीला बघितल्यानंतर मनाचा निश्चय केला कीं कितीही किंमत पडो आपण हिला खरेदी करणारच. झालें. वसुमतीला भाव येऊं लागला. शेवटीं त्या वेश्येनें ५०० सोन्याच्या मोहरांस तिला विकत घेतली.

वसुमति त्या वेश्येस म्हणाली, "आपण कोण आहांत? आपल्या घरीं मला काय काम करावें लागेल?" वेश्या उत्तरली, "माझे लाडके, तुला कांहीं काम नाहीं. फक्त खायचें, पानसुपारी नाच गाणें व जे यजमान येतील त्यांचें मनरंजन करावयाचें, तुझ्या तैनातीस मी तीन तीन दासी देईन. कळलं बेटा?"

वेश्येचें हे बोल ऐकतांच वसुमतीनें तिच्याबरोबर जाण्यास नकार दिला. वेश्या तिला बळजबरीनें नेऊं लागली. वसुमतीनें 'पंचपरमेष्टीचें' स्मरण केलें. तात्काळ आकाशांतील देव तिच्या मदतीस धावले. त्यांनीं त्या वेश्येचें नाक कापलें. हा प्रकार बघून सर्वच घाबरले. ती वेश्या वसुमतीस तेथेंच टाकून निघून गेली. सबंध बाजारांत खळबळाट उडाला. सेनापतीनें त्वरा करून वसुमतीस तेथून दुसरीकडे नेलें व तिथें धनवाहक नामक शेटजीस तिला विकून टाकलें. धनवाहक शेट व वसुमतीमध्यें परत बोलणें झालें. वसुमतीनें नम्रभावाने शेटजीस विचारलें, "आपणाकडे काय काम करावें लागेल?" शेटजी म्हणाले, "बाळ, सांजसकाळ मंदिरांत जायचं. प्रभु भक्ति करायची धर्माच्या गोष्टी ऐकावयाच्या व साधुसंतांना गोचरी (भिक्षा) घालावयाची व सदाचारानें राहावयाचे." हें ऐकून वसुमतीस फार आनंद झाला. ती आनंदानें शेटजीबरोबर जाण्यास तयार झाली. सेनापतीसही हायसें वाटलें.

धनवाहक शेट व वसुमति हीं दोघे बाजारांतून घरीं जाण्यास निघालीं. धनवाहक शेट पुढें व त्यांच्या मागोमाग वसुमति गुपचुप चालली होती. धनवाहक शेटचें घर आलें. वसुमति मोठ्या आनंदानें आंत गेली. तिथें उभ्या असलेल्या मुळा शेठाणीस तिनें नमस्कार केला व ती एका बाजूस उभी राहिली.

धनवाहक शेट म्हणाले 'शेठाणीजी, ही पहा आपली मुलगी चंदनबाला. मी हिला आणले आहे. हिचें चांगले पालन पोषण कर बरं कां?" स्त्रीबुद्धि यात द्वेषी आणि मत्सरी असते. मुळाला

वसुमतीबद्दल मत्सर वाटू लागला. संशय नाही अशी स्त्री विरळा. मुळाला वाटले शेटजी तिला आज आपली मुलगी म्हणून म्हणतात खरें. पण पुरुषाची जात! काय नेम सांगावा! माझें वय झालेलें. कदाचित् शेटजो पुढेंमागें हिच्या बरोबर लग्नही करतील मग मला मात्र दुःखांत पडावें लागेल. छट् 'सवत' नकोच ती कल्पना मला सहन होत नाहीं आतां बेसावध राहून पुढें पश्चाताप करण्यापेक्षां आतांपासूनच हिचा कांटा काढण्याचा उद्योग केला पाहिजे मात्र या गोष्टीची कोणालाही कल्पना येतां कामा नये वरपांगीं तरी आपण आईचें प्रेम दाखविलें पाहिजे तिनें वरकरणी चंदनबालेबद्दल मोठें समाधान व्यक्त केलें. तिला मोठ्या प्रेमानें जवळ ओढून घेतले व तिचा तिनें एक पापाही घेतला. मातृसौख्याला पारखी झालेली चंदनबाला शेठाणीच्या मायावी मायेला भुलली. तिला वाटलें आई गेली पण निदान आतां तरी आईच्या प्रमाचा आधार आपणास मिळाला. चंदनबाला मोठ्या गुण्यागोविंदानें राहूं लागली एका खानदानी मुलीच्या चारित्र्याचें आपण रक्षण केलें म्हणून शेटजीनाही मोठें समाधान वाटलें. मुळा शेठाणी मात्र मनांतल्या मनांत चरफडत होती. ती संधीची वाट पहात होती. तिला तशी संधी लौकरच मिळाली. मुलांनो, कदाचित् चंदनबालाची झाली एवढी कसोटी परमेश्वराला अपुरी वाटली कीं काय म्हणूनच त्यानें आणखी एक दुःखाचा डोंगर तिच्यापुढें रचून ठेवला होता.

एका संध्याकाळीं शेठाणी शेजाऱ्याकडे कांही कामास्तव गेली होती. तितक्यांत धनवाहक शेठ आपलें काम आटोपून घरीं परत

आले. तेव्हां चंदनबालानें निष्पाप मनानें आपली आई घरीं नाहीं हें बघून वडिलांचे पाय धुतले. पाय धुतां धुतां चंदनबालेची वेणी बाजूला पडली. शेटजीनीं आपल्या हातानें वेणी बाजूला केली व वेणीतून खालीं पडलेलें फूल ते परत वेणींत खोवूं लागले. एवढयांत शेठाणी आली. शेटजीला फूल खोंवताना पाहून मुळा विस्मय-चकीत तशीच गोरीमोरी झाली. तिची खात्री पटली, आपण घेतला तोच संशय खरा. चंदनबाला उपवर झाली आहे. शेटजींचे हे असे चाळे. खास ते तिच्याशीं लग्न करणार व चंदनबाला माझी सवत होणार. मुळा शेठाणी केवळ गप्प बसणारी नव्हती. तिनें चंदनबालाला मारून टाकण्याचा निश्चय केला. 'हा कांटा आतां कायमचा काढून टाक' असें तिचें मन तिला सारखें सांगत होतें. मुळा शेठाणी संधीची वाट पहात होती. चंदनबाला उपवर झाल्यामुळें तिच्यासाठीं योग्य पति कसा मिळेल या विवंचनेंत शेटजी होते; तर आतां आपलें लग्न होऊन आपण लौकरच सासरी जाऊं. मग आपला सर्व भोग संपेल व आपण सुखी होऊं या मनोराज्यांत चंदनबाला दंग होती.

एक दिवस धनवाहक शेट कांहीं कामानिमित्य परगांवीं गेले. मुळा शेठाणीला ही सुवर्णसंधी मिळाली. मुळा शेठाणीला चंदन-बालाच्या सुंदर भरगच्च व लांब केशकलापाचा हेवा वाटत होता. तिची ती भरघोस लांबसडक वेणी पाहून ती मनांतल्या मनांत जळफळे. मुळा शेठाणीनें एका न्हाव्याकरवीं चंदनबालाचे सर्व केस कापून काढले. दहा रुपये बक्षिसी मिळाल्यामुळें खूष होऊन न्हावी निघून गेला पण बिचारी चंदनबाला! जणू काय तिच्या

अनुक्रम 29८२१


प्राणाचा ठेवाच गेला म्हणून तिला मरणप्राय दुःख झालें. सौंदर्यवान चंदनबाला क्षणार्धात् विद्रुप झाली. एवढ्यावरच थांबलें नाही. शेठाणीनें चंदनबालाच्या हातांपायांत जाड लोखंडी बेड्यी ठोकल्या व तिला एका गुप्त अंधाऱ्या तळघरांत कोंडून ठेवली. 'देवा, मोहक सौंदर्य तूंच उत्पन्न करतोस. पण त्याच सौंदर्यानें आजपर्यंत कैक तरुणीचे प्राण हरण केलें असतील. देव व दैव-लीला विचित्र आहेत हेंच खरें. मुळा शेठाणीची सवतवृत्ति जागृत झाली होती. ही वृत्ति डोळस नसून आंधळी आहे. तिला खरें खोटें, न्याय नीति कांहीं दिसत नाहीं. पण दुष्ट म्हणून दिसणाऱ्या माणसाच्या हृदयांत देखील सुप्त सद्भावना असतात. मुळाचें सुविचारी मन तिला खाऊं लागलें. पण 'सवतीमत्सर तिचें समाधान करी. तो म्हणे, "शत्रूला दया दाखवण्यांत काय अर्थ आहे? शत्रूचा निःपात करणें हेंच शहाणपणाचें. आज तुला दया वाटते, पण सवत डोक्यावर येऊन बसली व तुझें हालहाल झालें म्हणजे मग कळेल तुला. अग, सवतीच्या जाचांत राहण्यापेक्षां फाशीं गेलेलें काय वाईट ? फांसांत एकदांच जीव जाईल, पण सवत, रोज जीव खाईल व मरणाआधींच मरणाचें दुःख वांट्यास येईल. त्यापेक्षां आधींच तू तिचा काटा काढते आहेस तें मुळींच गैर नाहीं. त्यांत कसलें पाप ? आतांच संधी आहे. उठ, कामाला लाग," असा हा सवती-मत्सर मुळा शेठाणीचें समाधान करून तिला उत्तेजीत करीत होता. इकडे साध्वी चंदनबाला आपल्या मनाचें सांत्वन करीत बसली होती. तिचें सात्विक मन सांगे, "यांत मुळाचा काय दोष ? तुझें पूर्वकर्म. कर्मभोग सर्वांनाच भोगावा लागतो. द्रौपदीची नाहीं कां विटंबना झाली ? आणि

ती सुद्धां कृष्णासारखा समर्थ देव पाठीराखा असतांना. बाई, दुःख करुं नकोस. आनंदानें व हंसतमुखानें कर्माचें स्वागत कर कीं त्यांतील विषाचें अमृत होईल. वैऱ्यावरही शुद्ध प्रेम कर, सत्य व शील सोडूं नकोस. परमेश्वरास शरण जा. त्याचें ध्यान कर- कर्ता करविता तो आहे. तुझ्या शुद्ध आचरणाचा मोबदला तुला जरूर मिळेलच मिळेल. घाबरुं नकोस" ती धैर्यानें व निष्ठेनें काल कंठीत होती. नवकार मंत्राचा सारखा जप ती करीत होती. ती वीतारागमय बनली होती.

आज चार दिवस झाले चंदनबाला तळघरांत होती तीन दिवसानंतर धनवाहक शेठ काम संपवून आज घरीं परतले होते. आल्याबरोबर त्यांनीं चंदनबालेची चौकशी केली. ती दिसत नाहीं असें पाहून चंदनबाला कुठें आहे असा शेटजींनी प्रश्न केला. "गेली असेल इकडे तिकडे खेळायला" असें उडवा उडवीचें उत्तर शेठाणीनें दिले, दुपारचें तीन वाजलें तरी चंदनबालाचा पत्ता नाही. हें पाहून धनवाहक शेठना चिंता लागून राहिली. त्यांनीं नोकरांना तिचा शोध करण्यास सांगितलें. पण पत्ता लागेना. धनवाहक शेठ चिंताग्रस्त मनः- स्थितींत घरीं येत होते. रस्त्यांत त्यांना एक म्हातारी भेटली. तिनें शेठजीच्या कानांत कांहींतरी सांगितलें व ती निघून गेली धनवाहक शेठजीच्या चेहऱ्यावर चिंता व आशा यांचें मिश्रण दिसून येत होतें. ते लगबगीनें घरी आले. मुळा शेठाणीची वाट न बघतां ते तडक घरांत कोठेंतरी निघून गले. मुळा शेठाणीला या गोष्टीचा कानोसा लागला. ती लगेच स्वयपाक घरांत गेली. नंतर स्वयंपाक घराला कुलूप लावून निघून गेली.

अभिग्रह कोणासही सांगावयाचा नसतो तो मनांतच ठेवावयाचा असतो. नैसर्गिकरीत्या जर आपल्या अभिग्रहाची पूर्ति झाली तरच भिक्षा घ्यावयाची असते, नाहीं तर नाहीं.

जवळ जवळ सहा महिने होऊन गेले, पण भगवान महावीरांच्या अभिग्रहाची पूर्ति होण्याचा योग आला नव्हता. आजही भगवान महावीर गोचरीसाठीं ( भिक्षेसाठीं ) निघाले होते. जातां जातां ते धनवाहक शेठजीच्या घरीं आले. पाहिजे असलेली संधि चालून आलेली पाहून चंदनबालेला आनंद झाला. तिनें लगेच श्रमण भगवान प्रभु महावीरांना गोचरी घेण्यासाठीं विनंति केली. ती म्हणाली; " हे भगवान, आज मी किती भाग्यवान आहे. माझ्या घराला आज भगवान महावीरांचे पाय लागले. आपण याचा स्वीकार करा." भगवान महावीरांच्या निश्चयांतील सर्व गोष्टी पूर्ण होत होत्या. फक्त एकच गोष्ट नव्हती. ती म्हणजे अश्रू. तेव्हां भगवान महावीर भिक्षा न घेतांच परतलें. हें बघून चंदनबालेस फार वाईट वाटलें. ती स्वत:ला दोष देऊं लागली व रडूं लागली. रड–ण्याचा हुंदका कानीं पडतांच भगवान महावीर मागें परतले व त्यांनीं भिक्षेचा स्वीकार केला. तोंच काय चमत्कार! आकाशांतून पुष्पवृष्टी झाली. दुंदुभी वाजूं लागल्या. चंदनबालाच्या पायांतील लोखंडी बेड्या निमिषार्धांत तुटून पडल्या. त्या ऐवजी तिच्या हातापायांत सोन्याचे दागिने दिसूं लागले. डोक्यावर पूर्ववत लांब व काळेभोर केस दिसू लागले. गेलेले सौंदर्य फिरून प्राप्त झाले. इतक्यांत धनवाहक शेटजी लोहाराला घेऊन आले. पहातात तों काय आश्चर्य ! चंदनबाला चांगला पोषाक करून उभी होती. तिनें

आपल्या वडिलाना सर्व हकिकत सांगितली. नंतर धनवाहक शेठ व चंदनबाला भगवान महावीरांच्या पाया पडले. भगवान महावीर भिक्षा ग्रहण करून निघून गेले.

मुलानों, श्रमण भगवान महावीरांनी आपल्या तपाचें पारणें केले. त्यांचा आत्मा तृप्त व शांत झाला. चंदनाप्रमाणें शीतल अशा या वसुमतीचें नांव तेंव्हापासून 'चंदनबाला' पडलें,

चंदनबालेच्या जीवनांतील विविध घटनांचा तिच्या जीवनावर फार खोल व दूरवर परिणाम झाला. तिची वृत्ति धर्माकडे वळली. तिनें आपले राहिलेलें जीवन धर्म कार्यासाठी वाहून घेतलें.

★ ★ ★

पंच परमेष्टी ( नवकार महामंत्र )

नमो अरिहंताणं. ।

नमो सिद्धाणं ।

नमो आयरियाणं ।

नमो उवज्झायाणं ।

नमो लोए सव्व-साहूणं. ।

एसो पंच-नमुक्कारो. सव्व-पाव-प्पणासणो.

मंगलाणं च सव्वेसिं, पढमं हवई मंगलं. ।

अनुक्रम 29607
विभाग
क्रमांक
नों. दि.
IRBK-0106291
IRBK-0106291

## ' चंदनबाला '

जैन धर्मांची तत्वें सोप्या रितीनें मराठी भाषेंतून मांडण्याबद्दल लेखक खरोखरच अभिनंदनास पात्र आहे. ही गोष्ट सहिष्णुतेचा सत्याचा आणि धर्मांचा परिणामकारक धडा शिकविते.

भारतीय स्त्रियांचे स्त्रीत्व या गोष्टींत ठळक रितीनें दाखविण्यांत आलेलें आहे. या पुस्तिकेचा स्त्री प्रौढांच्या मनावर फारच मोठा परिणाम होईल. तसेंच वर्तमान आणि पुढच्या पिढीस हें पुस्तक उपयुक्त होईल असें वाटतें

**बी. एम. कापडिया**
समाज शिक्षणाधिकारी

श्री. महेन्द्र कुमार मर्चंट यांची बालवाचकांना ही एक नवीन भेट आहे. जैन वाङमयांतील ' भगवान नेमनाथ ' नंतर ही दुसरी कथा त्यांनी मराठी वाचकांना सादर केली आहे. आपल्या शीलाचें रक्षण करण्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची तयारी दाखविणाऱ्या एका तेजस्वी स्त्रीची ही कथा आहे. आमच्या बाल वाचकांना महाराष्ट्र सारस्वतांतील अनेक वेंचलेली माणकें मराठी लेखकांनीं सादर केली आहेत. परंतु परभाषेंतील ' चंदनबाले ' सारख्या कथा वाचावयास मिळत नाहींत. त्या दृष्टीनेंच कै. साने गुरुजींनी ' आंतर भारती ' चा प्रसार करण्याची आवश्यकता प्रतिपादली. श्री. मर्चंट यांचें हें पुस्तक या कार्यास पोषक असेंच आहे. साधी परंतु प्रसंग डोळ्यासमोर उभी करणारी भाषाशैली, चटकदार कथानक यामुळें हें पुस्तक बालवाचकांना खचितच आवडेल असें आहे. मुखपृष्ठ अतिशय सुंदर आहे.

संपादक, ' निर्धार ' ठाणें.

---

मुद्रक प्रकाशक, माधव य. गडकरी बी. ए. (ऑनर्स) कोहिनूर प्रि प्रेस ठाणें